मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी–चिंचवड
» सोमवार, दि. 27 मे 2024 | पान- 1

# नवउद्योजकांना भूखंड मिळण्यात अडचण!

## एमआयडीसीच्या जागेवर तब्बल 16 झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण : एमआयडीसी अधिकाऱ्यांचे सर्वेक्षणाकडे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) जागेवर तब्बल १६ झोपडपट्ट्यांनी अतिक्रमण केले आहे. महापालिकेने एमआयडीसी च्या जागेवर झालेल्या अतिक्रमणांचा सर्व्हे करून तब्बल २४ वर्षे उलटून गेली आहेत. तेव्हा केलेल्या सर्व्हेनुसार 'एमआयडीसी'च्या सुमारे १५० एकर जागेवर अनेक झोपडपट्ट्यांनी अतिक्रमण झाल्याची नोंद आहे. या जागेवर झालेल्या अतिक्रमणांमुळे उद्योजकांना कंपनीचा विस्तार करण्यासाठी उद्योजकांना नवीन जागा मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

महापालिकेच्या वतीने शहरातील झोपडपट्ट्यांचा २००२ मध्ये सर्व्हे केला असून, एमआयडीसीच्या जागेवर एकूण किती झोपड्या आहेत, यापैकी घोषित व अघोषित झोपडपट्ट्यांची नोंद ठेवली आहे. झोपडपट्ट्यांचे क्षेत्रफळ, झोपड्यांची संख्या, लोकसंख्या , आरक्षणाची माहिती व शेरा आदींची नोंद ठेवण्यात आली आहे.

महापालिकेने केलेल्या सर्व्हेनुसार शहरात एकूण १६ झोपडपट्ट्यांचे एमआयडीसीच्या जागेवर अतिक्रमण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या पैकी पाच अघोषित तर अकरा घोषित झोपडपट्ट्यांचा समावेश आहे. एमआयडीसीची पिंपरी व भोसरी परिसरात एकूण एक हजार शंभर हेक्टर जागा आहे. झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण झाल्यामुळे सुमारे १५० एकर जागा झोपडपट्ट्यांअंतर्गत आली आहे. कालांतराने अतिक्रमण करणाऱ्यांची संख्या अधिक वाढली असल्याचा अंदाज आहे. त्याबाबतचा सर्व्हे महापालिकेकडून करण्यात येत आहे. मात्र, अनेक वर्षे झाली तरी हा सर्व्हे पूर्ण झालेला नाही. त्यामुळे सध्या एमआयडीसीच्या भूखंडावर किती अतिक्रमण झाले याची निश्चित आकडेवारी नाही.

अतिक्रमण झाल्याने उद्योजकांना आपल्या कंपन्यांचा विस्तार करण्यासाठी किंवा नवीन उद्योग सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. सध्या एमआयडीसीकडे जागाच शिल्लक नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे उद्योजकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्या ठिकाणी कंपनीचा विस्तार करता येत नाही. त्यासाठी परवानगी काढताना नाकी नऊ येत आहे.



> अतिक्रमण झालेल्या भूखंडांबाबत 'एमआयडीसी'कडून सर्व्हे झाल्याची माहिती नाही. 'एमआयडीसी'ने लक्ष घालून महापालिकेकडील रिकामे भूखंड उद्योजकांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ते मिळत नाहीत.
> - संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योजक संघटना

> पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरात सर्व्हे होण्याची नितांत गरज आहे. कारण एमआयडीसीतील अनेक भूखंडांवर अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे कोठे भूखंड शिल्लक आहेत, याबाबतची माहिती अधिकाऱ्यांनाच नाही.
> - अभय भोर, अध्यक्ष, फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन

### महापालिकेच्या ताब्यातील भूखंड मिळेना

» पिंपरी-चिंचवड महापालिकेला विविध कारणांसाठी 'एमआयडीसी'कडून मोकळे भूखंड देण्यात आलेले आहेत. मात्र, ज्या कारणांसाठी हे भूखंड दिले आहेत, त्याचा उद्देश पूर्ण होताना दिसत नसल्याच्या तक्रारी उद्योजक करत आहेत. अशा भूखंडांवर अनधिकृतपणे अतिक्रमणे करून गैरवापर केला जात आहे. त्यामुळे हे भूखंड पुन्हा ताब्यात घेऊन त्याचे प्लॉट करून उद्योजकांच्या ताब्यात देण्याची मागणी उद्योजक करत आहेत.

# स्वतंत्र विद्युत वाहिनीमुळे विजेची समस्या टळणार

## वीज पुरवठ्याची समस्या संपणार आता समस्या जाणवणार नाही : कार्यकारी अभियंता अतुल देवकर

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली परिसरातील खंडित वीज पुरवठ्याची समस्या संपणार आहे. त्या भागाला प्लीज पुरवठा करणाऱ्या विद्युत वाहिनीची स्वतंत्र व्यवस्था केली आहे. गेल्या आठवड्यात अवकाळी पावसातील हवेमुळे ही समस्या निर्माण होत होती. आता ती समस्या जाणवणार नाही, अशी माहिती भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांनी दिली.

महापालिका क्षेत्रातील चिखली गावठाण परिसरात वीजपुरवठा वारंवार खंडित होत होता. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिक उकाड्याने हैराण झाले होते. अवकाळी वादळी पाऊस, उष्मालाटेची काहिली त्यात सतत बत्ती गुल होत असल्याने घामाच्या धारांनी नागरिक हैराण झाले आहेत. वीज गायब झाल्यावर बहुतांश मोबाईल कंपन्यांचे नेटवर्कही ठप्प होते.

तर नुकसान होत असल्याचे उद्योजक सांगत होते. चिखलीमधील रामदासनगर, कुदळवाडी, पाटीलनगर, मोरेवस्ती, आदी भागांत खंडित वीजपुरवठ्याची समस्या होती. पाटीलनगर परिसरात मागील काही दिवसांपूर्वी कित्येक दिवस वीजपुरवठाच खंडित होता. चिखली परिसरात लघुउद्योग आहेत; परंतु सतत वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे लघुउद्योगांचे कामकाज ठप्प होऊन नुकसान होते. सातत्याने वीजपुरवठा बंद होत असल्याने नागरिक त्रस्त झाले होते छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना मनस्ताप होत होता.

चिखली, मोई या दोन्ही गावांना एकाच वीजवाहिनीद्वारे वीजपुरवठा होता. मोई परिसरातील खाणीत शेकडो क्रशर आहेत. त्यांचेही आर्थिक नुकसान होत होते. याबाबत तक्रारी वाढत होत्या. मात्र, आता ही समस्या कळणार असल्याचे महावितरण कडून सांगण्यात आले.



> या परिसरातील एकाच फिडरवर मुळशी तालुक्यातील तसेच पुणे जिल्ह्यातील काही प्रमाणातील ग्रामीण भाग अवलंबून होता; परंतु स्वतंत्र विद्युतवाहिनी टाकल्याने सतत खंडित होणारा वीजपुरवठा आता खंडित होणार नाही. दोन दिवसांमध्ये पाऊस, वादळी वारा आणि झाडपडीच्या घटनांमुळे वीजपुरवठा खंडित झाला.
> - अतुल देवकर, कार्यकारी अभियंता

# आमदार टिंगरे यांची चौकशी होणार का?

## हस्तक्षेपाचा मृतांच्या नातेवाइकांचा आरोप, तरी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे मौन

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघातप्रकरणी पुणे पोलिसांनी अग्रवाल कुटुंबीयांभोवती फास आवळला आहे. इतकेच नव्हे, तर पब चालकांनाही बेड्या ठोकल्या आहेत. मात्र, घटनेच्या वेळी पोलीस ठाण्यात उपस्थित असलेल्या आमदार सुनील टिंगरे यांच्यासंदर्भात मौन बाळगले आहे. पोलीस ठाण्यात चालक बदलण्याचा प्रयत्न केला गेला, तेव्हा टिंगरे तिथेच उपस्थित असल्याचा आरोप मृतांच्या नातेवाईक आणि मित्रमंडळींनी केला होता.

पोलीस ठाण्यात टिंगरे उपस्थित असल्याचे आयुक्तांनीही मान्य केले आहे. त्यानंतर टिंगरे यांनी समाज माध्यमातून तेथे उपस्थित असल्याबद्दल त्यांची बाजू मांडली होती. मात्र, तपासाचा भाग म्हणून टिंगरे यांची चौकशी होणार का नाही, यावर मात्र सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी मौन बाळगले आहे.

यासंदर्भात पोलिसांनी सांगितले, की घटनेच्या दिवशी रात्रीच चालक बदलण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र, तेव्हा कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी सदसदविवेक बुद्धीने किंवा फिर्यादींचा दबाव बघून तसे केले नाही. त्यांनी गाडी चालवत असलेल्या अल्पवयीन मुलावरच गुन्हा दाखल केला. मुलावर गुन्हा दाखल झाल्यावरही पुढील काही तास चालक स्वतःवर गुन्हा दाखल करण्याची विनंती करीत होता. त्याला तसे पढवले गेले होते. यामुळे तो हा गुन्हा स्वतःच्या अंगावर घेऊ इच्छित होता.

मात्र, पोलिसांनी त्याला दाद दिली नाही, तसेच बाल न्यायमंडळात देखील अग्रवाल कुटुंबाच्या वकिलांनी चालकच गाडी चालवत असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात काही व्यवहार ठरला असेल, अशी अनेकांना शंका वाटत आहे. मात्र, गुन्हा अग्रवाल कुटुंबाच्या मर्जीप्रमाणे दाखल झालेला नाही. गुन्हा त्यांच्या विरोधातच दाखल झाला आहे. यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना अग्रवाल कुटुंबांकडून काहीही मिळणार नाही, हेही तितकेच स्पष्ट आहे.



### 'मी दिल्लीत होतो'

» सुरेंद्र अग्रवाल याला शनिवारी दुपारी (ता. २५) न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्या वेळी न्यायालयाने त्याला पोलिसांच्या विरोधात काही तक्रार आहे का, असे विचारले होते. त्यावर त्याने न्यायालयास सांगितले, की अपघात घडला, तेव्हा मी पत्नीसोबत दिल्लीत होतो. त्यामुळे या सर्व प्रकाराची मला काही माहिती नसून त्यात माझा सहभाग नव्हता.

### चौकशीची शक्यता वाढली

» अल्पवयीन आरोपीला पोलीस ठाण्यात पिझ्झा देण्यात आल्याचे, तसेच आमदार टिंगरेंच्या उपस्थितीत नातेवाइकांवर दबाव टाकण्यात आल्याचे प्रकरण पोलिसांच्या अंगलट आले आहे. खुद्द गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही तपासून कारवाईचे आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे पोलीस ठाण्याचा डिव्हिआरही ताब्यात घेण्यात आला आहे, तर दुसरीकडे पालकमंत्री अजित पवार यांच्यावर टिंगरे त्यांच्या पक्षाचे आमदार असल्यामुळे टीका होत होती. या टीकेलाही पालकमंत्री पवार यांनी उत्तर दिले असून, अपघात प्रकरणात राजकीय हस्तक्षेप नकोच, असे स्पष्ट केले आहे. यातच गुन्हा गुन्हे शाखेकडे वर्ग झाल्याने टिंगरेकडे चौकशी होण्याची शक्यता वाढली असल्याचे सांगितले

# अग्रवालचा कारचालक मानसिक दबावाखाली : अमितेश कुमार

## आरोपी मुलाचे वडील व आजोबा यांनी दोन दिवस कारचालक गंगाधर हेरीक्रुब यास डांबून ठेवले होते

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन आरोपी मुलाचे वडील व आजोबा यांनी दोन दिवस कारचालक गंगाधर हेरीक्रुब यास डांबून ठेवले होते. त्याच्या पत्नीने त्याची सुटका केल्यावर तो मोठ्या मानसिक दबावाखाली होता. पोलिसांना याची माहिती समजल्यावर त्याचा येरवडा पोलीस ठाण्यात जबाब नोंदविण्यात आला, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली

अमितेश कुमार म्हणाले, पुणे पोलिसांनी याबाबत सदर अग्रवालच्या घरी छापा टाकून घटनास्थळी पंचनामा केला आहे. त्याला बंगल्यातील कोणत्या खोलीत डांबून ठेवण्यात आले, अपहरण करण्यासाठी कोणती गाडी वापरली, चालकाने कंपनीचे जे कपडे घातले होते, ते बंगल्यात सोडले होते, त्याची तपासणी करायची आहे. चालकाने पोलिसांना सांगितले की, त्याने घटना दिवशी कार चालवली नाही.

मात्र, त्याच्यावर दबाव टाकून त्यास जबरदस्ती केल्याने त्यास मानसिक धक्का बसला आहे. त्याला कोणत्या प्रकारची मारहाण करण्यात आली आहे का? याबाबत अद्याप त्याने काही सांगितले नाही. कारमध्ये जी दोन मुले होती, त्यांच्या संर्पकात पोलीस असून, ती अल्पवयीन असल्याने पोलीस ठाण्यात बोलवता येत नाही. मात्र, त्यांच्या घरी जाऊन चौकशी करण्यात येत आहे.

कारचालक बदलण्याचा प्रयत्न केल्याची वस्तुस्थिती पोलिसांसमोर आली आहे. तपासाला आता गती आली असून, सर्व दिशेने याबाबतची चौकशी करण्यात येत आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून कारमध्ये नेमके किती जण होते, याचीही चौकशी करण्यात येत आहे.

**पोलिसांकडून चालकाला सुरक्षा**

अग्रवाल कुटुंबीयांचा चालक गंगाधर हेरीक्रुब याला असलेल्या सुरक्षेचा धोका लक्षात घेता पुणे पोलिसांनी चालकाला सुरक्षा व्यवस्था पुरविली आहे. इंडियन एव्हिडन्स ॲक्टनुसार चालकाला सुरक्षा पुरविण्यात आली आहे.

**सीन रिक्रिएशन सुरू**

घटनेच्या दिवशी नेमके काय घडले होते. अल्पवयीन आरोपी घराच्या बाहेर कधी पडला, कुठे-कुठे गेला, त्याने काय केले, त्याला कोण- कोण भेटले, या सगळ्या घटनेचे सीन रिक्रिएशन करण्याचे काम सुरू आहे.



### अपहरण करून बंगल्यात डांबून ठेवले

» हेरीक्रुब यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे, की येरवडा पोलिस स्टेशन येथून मी माझ्या घरी जात असताना सुरेंद्र अग्रवाल सरांनी मला येरवडा पोलिस स्टेशनच्या बाहेर आल्यानंतर बोलावून घेतले. मला धमकी देऊन माझ्या इच्छेविरुद्ध त्यांच्याकडील बीएमडब्ल्यू गाडीत बसवून ब्रह्मा सनसिटी येथील त्यांच्या बंगल्यात नेले. तेथे सुरेंद्र अग्रवाल व विशाल अग्रवाल यांनी आपापसांत संगनमत करून मला धमकावले व माझा मोबाइल फोन काढून घेतला. त्यांच्या बंगल्यामध्ये डांबून ठेवले. त्यानंतर धमकावले, की त्यांच्या मुलाने केलेला गुन्हा स्वतः वर घे व त्याबाबत कोणाशी बोललास, तर याद राख.

### पत्नीने गोंधळ घातल्याने केली सुटका

» हेरीक्रुब घरी न आल्याने त्यांची पत्नी अग्रवाल यांच्या बंगल्यावर गेली. तेथे सुरुवातीला तिला दाद दिली नाही. मात्र, तिने आरडाओरडा करत गोंधळ घातल्यावर हेरीक्रुबला तिच्यासमोर आणण्यात आले. त्यानंतर तिलाही पैशांचे आमिष दाखवण्यात आले. मात्र, तिने ते धुडकावून लावल्यावर हेरीक्रुबला तिच्यासोबत सोडण्यात आले. जाताना दोघांनाही कोणाशी काहीही न बोलण्याची धमकी देण्यात आली.

# बांधकामांसाठी अधिकाऱ्यांनी पैसे घेतले

## इंद्रायणी नदी पात्रालगतच्या हद्दीतील बांधकामांसाठी महापालिका अधिकाऱ्यांनी पैसे घेतल्याचा आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी, बोऱ्हाडेवाडी परिसरात इंद्रायणी नदी पात्रालगतच्या पूर प्रतिबंधक रेषेच्या (निळी) हद्दीतील बांधकामांसाठी महापालिका अधिकाऱ्यांनी पैसे घेतल्याचा आरोप महिलांनी केला आहे.

मोशी, बोऱ्हाडेवाडी परिसरात इंद्रायणी नदी पात्रालगतच्या पूर प्रतिबंधक रेषेच्या (निळी) हद्दीतील बांधकामांसाठी महापालिका अधिकाऱ्यांनी पैसे घेतल्याचा आरोप महिलांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणात महापालिकेच्या कोणत्या, अधिकाऱ्यांनी पैसे घेतले आहेत, त्यांची नावासह तक्रार करावी, योग्य ती कारवाई केली जाईल, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.

मोशीतील बोऱ्हाडेवाडीत इंद्रायणी नदी पात्रालगतचा भूखंड रहिवाशी भाग असल्याचे भासवून आणि त्याची जाहिरात करून २० ते २५ लाख रुपये गुंठ्याने नागरिकांना जागेची विक्री केली. शहरातील कामगार, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांनी जागा घेऊन घरे बांधली. परंतु, पूर रेषेत अनधिकृतपणे बांधकाम होत असताना महापालिका अधिकाऱ्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केले. पूर रेषेतील अतिक्रमण, अनधिकृत बांधकामांमुळे नदीचे पात्र अरुंद होवू लागले होते. याबाबत हरित लवादाकडे तक्रार करण्यात आली होती. परंतु, लवादाचे आदेश येण्यापूर्वीच महापालिकेने अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली.

पूर रेषेतील बांधकामांसाठी अधिकाऱ्यांना पैसे दिल्याचा आरोप महिलांनी केला. 'आम्ही मोलमजुरी करून जगणारी सर्वसामान्य कुटुंबे आहोत. तुम्ही घरे बांधा नंतर ती महापालिकेत नियमानुसार होतील', असे आम्हाला जागा घेताना सांगण्यात आले. नंतर महापालिकेच्या नोटिसा येण्यास सुरुवात झाली. महिन्यापूर्वी महापालिकेची काही माणसे आली. त्यांनी आम्हाला वीस लाख रुपये द्या, तुमच्या घराच्या विटेलासुद्धा कोणी हात लावणार नाही, असे सांगितले

शहरातील कामगार, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांनी जागा घेऊन घरे बांधली. परंतु, पूर रेषेत अनधिकृतपणे बांधकाम होत असताना महापालिका अधिकाऱ्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केले दरम्यान, या प्रकरणात महापालिकेच्या कोणत्या, अधिकाऱ्यांनी पैसे घेतले आहेत, त्यांची नावासह तक्रार करावी, योग्य ती कारवाई केली जाईल, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.



### बोऱ्हाडेवाडी येथील महिलांची कैफियत

» आम्ही मंगळसूत्र विकले, घरातील सोने गहाण ठेवले आणि महापालिकेच्या त्या माणसांना गुढीपाडव्याच्या दिवशी वीस लाख रुपये नेऊन दिले. आता आमच्या घरावर बुलडोझर फिरला. आम्ही दाद कोणाकडे मागायची, अशी कैफियत बोऱ्हाडेवाडी येथील पूर रेषेतील अनधिकृत बांधकामावर कारवाई झाल्यानंतर महिलांनी मांडली.

### नागरिकांनी नावासह तक्रार करावी

» पूर रेषेतील अनधिकृत बांधकामांवर नियमाप्रमाणे कारवाई झाली आहे. बांधकाम धारकांना यापूर्वीच नोटिसा दिल्या होत्या. त्यानुसार १० एप्रिल रोजी या बांधकामांवर कारवाई केली जाणार होती. निवडणुकीमुळे पोलीस बंदोबस्त मिळाला नाही. त्यानंतरही वेळोवेळी सूचना करूनही बांधकामे सुरूच ठेवली होती. कोणत्याही अधिकारी, कर्मचारी यांनी अतिक्रमण बाधितांकडून पैसे घेतले नाही. जर घेतले असतील तर नागरिकांनी नावासह तक्रार करावी, असे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर म्हणाले.

# देखभाल, दुरुस्तीअभावी धरणांची स्थिती बिकट

## दीपक बच्चे यांचा अहवाल ; लघु धरणांचा जिवंत साठाही गाळाने भरल्याने नामशेष होण्याच्या मार्गावर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात लघू, मध्यम व मोठी अशी एकूण ३४०० धरणे आहेत. या धरणांच्या देखभाल व दुरुस्ती अंतर्गत गेल्या ५० ते १०० वर्षांहूनही अधिक काळापासून धरणातील गाळ सर्वेक्षण अद्याप केले नाही. मोठी धरणे आजही २५ ते ६० टक्के गाळयुक्त आहेत तर; लघु धरणांचा जिवंत साठाही २५ ते ७० टक्के गाळाने भरला असल्याने ती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, असा निष्कर्ष धरण अभ्यासक दीपक बच्चे पाटील यांनी राज्य व केंद्र शासनाला पाठविलेल्या अहवालात काढला आहे.

राज्यात 'धरण सुरक्षा कायदा २०२१' ची अंमलबजावणी २०२३ पासून सुरु झाली आहे. मागील दहा वर्षांपासून बच्चे पाटील हे दिल्लीतील सेंट्रल वॉटर कमिशन या मुख्य संस्थेसह केंद्र सरकार व प्रत्येक राज्य सरकारला धरण सुरक्षेचा अहवाल पाठवत आहेत. देशातील १७ राज्यांनी या अहवालाची दखल घेतलेली आहे. आधुनिक पद्धतीने धरण सुरक्षा व देखभालीसाठी बच्चे पाटील यांनी 'स्टेटमेंट १०' हे पुस्तक लिहिले आहे. त्यावर २०१६ मध्ये महाराष्ट्रात एकात्मिक सुरक्षा धोरण राबविले गेले. राज्य सरकारने परिपत्रक काढून सर्व धरणांना पाठविले व त्याची अंमलबजावणी करण्यास सांगितले.

धरणातील गाळ काढून पाणी साठवणूक क्षमता अबाधित करण्यासाठी २०१४ मध्ये नियम तयार करण्यात आले व वेळोवेळी नियमात बदल केले. उजनी, जायकवाडी, गोसीखुर्द प्रकल्प, मुळा व गिरणा या पाच धरणांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर गाळ काढण्याची अंमलबजावणी सुरु केली. विविध कारणांमुळे आजपर्यंत एकाही धरणात गाळ उपसा कार्यवाही झाली नाही. येडगाव धरणात ३०.६ टक्के गाळ आहे. उजनी धरणात २७. ९४ टक्के गाळ आहे. घोड धरणात २२ टक्के गाळ आहे. हतणूर धरणामध्ये ५० टक्के गाळ आहे.



> 'राज्य सरकार २५ ते ३० वर्षांनंतर जागे झाले आहे. त्याचा परिणाम 'तहान लागली व आज विहीर खोदायला घेतली' असा होतो. भविष्यात एक वर्ष पाऊस न पडल्यास धरणात एक थेंबही पाण्याची साठवणूक होणार नाही. अशी परिस्थिती येऊ नये म्हणून शासनाने गाळ काढलाच पाहिजे.
> - दीपक बच्चे पाटील, धरण अभ्यासक

### मनुष्यबळाचा अभाव

» पाटबंधारे व जलसंपदा विभागात २५ ते ३० टक्के मनुष्यबळच नाही. ही परिस्थिती गेल्या अनेक वर्षांपासून आहे. राज्य सरकार दरवर्षी १५ ते १६ हजार कर्मचारी भरणार, अशी फक्त घोषणा करते. त्यामुळे मनुष्यबळाअभावी जलसंपदा व पाटबंधारे विभागाची अनेक कामे प्रलंबित आहेत. या विभागांना निधी नसल्यामुळे धरणांची सुरक्षा व देखभाल दुरुस्तीची कामे प्रलंबित आहेत.

# कोरेगाव परिसरात बिबट्याची दहशत

## त्वरित पिंजरा बसविण्याची ग्रामस्थांची मागणी, परिसरात भीतीचे वातावरण

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथे फरशी ओढयावर पद्माकर देवराम ढेरंगे यांच्या गोठ्यावरील बोकडाला शुक्रवारी सायंकाळी बिबट्याने झडप घालत शिकार केल्याची घटना घडली. लोकवस्तीमध्ये झालेल्या बिबट्याच्या हल्ल्याने कोरेगाव भीमा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोरेगाव भीमा येथील फरशी ओढ्याजवळ ढेरंगे यांचा गायीचा गोठा असून शेती कामासाठी असलेल्या एका कुटुंबाच्या देशी बोकडावर बिबट्याने हल्ला केल्याने पसरलेल्या भीतीच्या वातारवरणामुळे कोरेगाव भिमामध्ये त्वरित पिंजरा बसविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. घटनेची माहिती हेमंत ढेरंगे यांनी कोरेगाव भीमाचे सरपंच संदीप ढेरंगे यांना दिली असता ढेरंगे यांनी तातडीने वनविभागाशी संपर्क केल्याने नियत क्षेत्र अधिकारी बबन दहातोंडे यांनी घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला.

यावेळी सरपंच संदीप ढेरंगे, स्थानिक शेतकरी हेमंत ढेरंगे, पद्माकर ढेरंगे, चंद्रकला चाफेकानडे, नियत क्षेत्र अधिकारी बबन दहातोंडे व परिसरातील नागरिक उपस्थित होते.



> बिबट्याने हल्ला केल्याची घटना समजताच त्वरित घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून हल्ला केलेल्या बोकड मिळून आला नाही. पुढील कार्यवाहीसाठी घटनेची माहिती वरिष्ठांना कळवली असून त्वरित पिंजरा बसविण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.
> - बबन दहातोंडे, नियत क्षेत्र अधिकारी.

जुन्नर वन विभागात मानव बिबट संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे. बिबट्यांच्या हल्ल्यांच्या गंभीर घटना वाढत आहेत. बिबट्यांची वाढणारी संख्या लक्षात घेऊन बिबट नसबंदी करण्यात यावी, असा देशातील पहिला प्रस्ताव जुन्नर वन विभागाकडून जानेवारी2024 मध्ये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. त्याच्या मंजुरी करिता पाठपुरावा सुरू असल्याचे जुन्नरचे उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी स्पष्ट केले.

माणिकडोह बिबट निवारा केंद्राच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते सहायक वनसंरक्षक अमित भिसत्, संदेश पाटील, प्रदीप चव्हाण, वैभव काकडे यावेळी उपस्थित होते. सातपुते म्हणाले की, पिंपरी पेंढार येथे बिबट्याकडून हल्ल्याची घटना झाल्यानंतर जन भावनेचा उद्रेक झालेला होता. यावेळी एका महिला वन कर्मचाऱ्यावर हल्ला करण्यात येऊन गळा दाबण्यात आला. यामुळे या महिलेची वाचा गेली असल्याने नाईलाजाने याबाबत पोलिसांकडे तक्रार देण्यात येऊन गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

मानव बिबट संघर्ष सुरू झालेला असून बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर या तालुक्यांमध्ये सध्या 400 पेक्षा अधिक बिबट्यांची संख्या आहे. जुन्नरच्या पूर्व भागात बिबट हॉटस्पॉट तयार झालेले आहेत.

मेंढपाळांकरिता वन विभागाकडून जनजागृती करण्यात येत असून त्यांना राहण्याकरिता तंबूची व्यवस्था करण्यात येत आहे.

तसेच आर्टिफिशिल इंटेलिजन्स या तंत्राचा वापर करून मानवी वस्तीजवळ बिबट येईल तेव्हा कॅमेरे व अलार्म सिस्टीम राबवून सतर्क करण्यात येणार असल्याचा प्रादेशिक वन विभागातील राज्यातील पहिला प्रयोग जुन्नरमधे येत्या काही दिवसात राबविण्यात येणार आहे.

### पाटबंधारेची साडेबारा हेक्टर जागा मिळणार

» बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन तिच्या नियंत्रणाकरिता बिबट नसबंदी करण्यात यावी. असा प्रस्ताव मंजुरी करिता केंद्र शासनाकडे वनविभागाने सादर केलेला आहे. तसेच जुन्नरमधील माणिकडोह बिबट निवारा केंद्र सुरू असून तेथे 40 बिबट ठेवण्याची जागा आहे. या केंद्रालगतची पाटबंधारे विभागाची साडेबारा हेक्टर जागा वन विभागाला मिळणार असून तेथे विस्तारीत निवारा केंद्र तयार करून तेथे 60 बिबट ठेवण्याची व्यवस्था येत्या काही दिवसात होणार आहे.

# कालव्याच्या दूषित पाण्यामुळे शेतीचे आरोग्य धोक्यात

## दूषित पाण्यामुळे दौंडमधील बळीराजा चिंतेत : माती, मनुष्य, जलचर पशुपक्ष्यांचे आरोग्य बिघडले

**पुणे | प्रतिनिधी**

दौंडच्या शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्यासाठी कालव्याच्या माध्यमातून तलाव भरेपर्यंत पाण्यावर अवलंबुन राहावे लागत असत त्यावर पर्याय म्हणून बेबी कालव्यातून पुण्यामधील सांडपाणी दौंडच्या शेतीला देण्याचा निर्णय झाला. यामधून दौंडच्या शेतकऱ्याना सांडपाणी शेतासाठी मिळू लागले. मात्र यातील हिरव्यागार दुर्गंधीयुक्त रासायनिक सांडपाण्यातून शेतीसोबत जनावरे, जलचर, पशुपक्षी यांचे देखील आरोग्य धोक्यात आले आहे.

सध्या दौंड तालुक्यात बेबी कालव्याद्वारे शेतीला महानगरपालिकेचे रासायनिक सांडपाणी दिले जात आहे. शेतीला पाण्याची नितांत गरज आहे. मात्र दूषित पाणी दिल्यामुळे मातीचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच कुपनलिका व विहिरीमध्ये दूषित पाणी आल्यामुळे फिल्टर करून वापरण्यात येणारे पाणी सुद्धा सध्या मानवी आरोग्यास धोक्याचे ठरू लागले आहे.



> पुणे महानगरपालिकेने पाणी सोडताना चांगल्या पद्धतीने फिल्टर करावे. सध्या फिल्टर करत असताना त्याच्या गुणवत्ते कडे दुर्लक्ष केले जात आहे. दूषित पाणी माती, मनुष्य, पशुपक्षी यांचे आरोग्य धोक्यात आणत आहे. संबंधितांनी याकडे काळजीपूर्वक व जबाबदारीने लक्ष देऊन भविष्यातील धोका टाळावा.
> - नीळकंठ शितोळे, ज्येष्ठ शेती अभ्यासक, गलांडवाडी

शेतीला पाण्याची गरज आहे. मात्र मातीचे आरोग्य बिघडले तर भविष्यात क्षारयुक्त मातीमध्ये पिकांची उगवण क्षमता घटणार आहे. या पाण्यात मानवी आरोग्यास घातक असे सूक्ष्म घन खनिजे आढळून येत आहेत. जमिनीची पाण्याचा निचरा होण्याची क्षमता कमी होत आहे. त्यामुळे नापिकतेकडे वाटचाल होईल. उसासारख्या पिकाला या पाण्याचा थोडाफार फायदा होत असला तरी काही पालेभाज्यांना हे पाणी दिले तर त्या लगेचच जळून जातात. या पाण्याला हिरवागार रासायनिक रंग आहे. वाहत असलेल्या प्रवाहात प्रचंड फेस तयार होतो.जनावरांना, मानवाला व जलचरांना याचा प्रचंड धोका आहे. भविष्यात कर्करोगासारख्या महाभयंकर रोगांना सामोरे जावे लागणार आहे.

### पालकमंत्र्यांनी लक्ष द्यावे

» पुणे महानगरपालिकेतील प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे फिल्टर बसवले आहेत. जल नियोजन समिती व पालकमंत्र्यांनी याकडे लक्ष देऊन या पाण्याचे शुद्धीकरण उच्च कोटीचे करण्याकडे लक्ष द्यावे. शेती व मानवी आरोग्यास योग्य असल्यासच ते कालव्याद्वारे पुढे पाठवावे, अशी मागणी जोर धरीत आले.